 मोटार अपघात प्रकरण क्र. १८८/२०२१
पुजा वि. प्रविण व इतर
नि.क्र. ३८ **CW-1**

**अर्जदारातर्फे शपथेवर पुढील सरतपास ॲडव्होकेट श्री. एस.के. पटेल**

९. मी सदर प्रकरणात पोलीस पेपर्स दाखल केले आहेत. एफ.आय.आर. ची कॉपी **नि.क्र. ५१** वर आहे. एम.एल.सी. **नि.क्र. ५२** वर आहे. घटनास्थळ पंचनामा **नि.क्र. ५३** वर आहे. मरणोत्तर पंचनामा **नि.क्र. ५४** वर आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट **नि.क्र. ५५** वर आहे. कलम ३०४-अ वाढवण्याबाबतचे पत्र **नि.क्र. ५६** वर आहे. प्रविण जमदाडेचे ड्रायव्हींग लायसन्स **नि.क्र. ५७** वर आहे. आर.सी. बुक **नि.क्र. ५८** वर आहे. आय.सी.आय.सी.आय. विमा पॉलिसी **नि.क्र. ५९** वर आहे. बजाज विमा पॉलिसी **नि.क्र. ६०** वर आहे.

**उलटतपास गैरअर्जदार क्र.३ तर्फे ॲडव्होकेट श्री. एस.एन. गुरव**

१०. माझ्या सासु सास-यांना दोन मुले आहेत. माझे सासू सासरे गावाकडे शेती करतात. माझे दीर सासु सासरेसोबत राहतात. माझ्या दिराला नोकरी आहे, तेच सासु सास-याचा संभाळ करतात. तसेच शेतीतूनही सासू सास-यांना उत्पन्न मिळते. सासू सासरे मला संभाळत नाहीत म्हणून मी त्यांचे विरुद्ध पोटगीची कारवाई केली नाही. अपघात झाला त्यावेळी मी माझ्या पतीसोबत नव्हते. मी अपघात प्रत्यक्ष बघितला नाही. माझे पतीचे बारावीपर्यंत शिक्षण झाले होते. माझ्या पतीच्या शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र मी दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या वेळी माझ्या पतीचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगते की माझे पती साता-याला खेळणी विकण्याचा व्यवसाय करत असत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगते की त्यांना महिना रुपये २०,०००/- मिळत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगते की ते एलआयसीचा प्रत्येक सहा महिन्याला रुपये ४२,३४८/- चा हप्ता भरत होते.

मोटारसायकल माझ्या पतीची स्वत:ची होती. त्या मोटारसायकलचे इन्शुरन्स होते. ती इन्शुरन्स पॉलीसी मी दाखल करु शकत नाही. अपघातानंतर इन्शुरन्स कंपनीकडे आम्ही क्लेम केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीकडे मोटारसायकलचे लायसन्स नव्हते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीकडे मोटारसायकलचे लायसन्स नव्हते म्हणून मी इन्शुरन्स कंपनीकडे क्लेम केला नाही. हे म्हणणे खरे नाही की अपघाताच्या वेळी माझ्या पतीने हेल्मेट घातले नव्हते. माझ्या पतीचा मृत्यु डोक्याला मार लागल्यामुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की अपघात माझ्या पतीच्या चुकीमुळे झाला. हे म्हणणे खरे नाही की माझे पती राष्ट्रीय महामार्गावर वेगात आणि निष्काळजीपणे वाहन चालवित होते. हे म्हणणे खरे नाही की कारचा अपघाताशी कसलाही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की अपघात हा कार चालकाच्या हयगयीपणामुळे व निष्काळजीपणामुळे झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांशी संगनमत करुन कार चालकाविरुद्ध खोटी तक्रार केली. हे म्हणणे खरे नाही की जास्तीचे पैसे मिळावे म्हणून खोटे शपथपत्र दाखल केले.

**<u>उलटतपास गैरअर्जदार क्र.४ व ५ तर्फे ॲडव्होकेट श्री. पी.टी. रेड्डी</u>**

११. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगते की माझे सासु सासरे मला व माझ्या मुलीला संभाळत नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIDYADHAR SHESHARAO MORE
Date: 2026.06.15 17:32:05 +0530

( विद्याधर शे. मोरे )

दिनांक :–१५/०६/२०२६

सदस्य

मोटार अपघात प्राधिकरण, लातूर